# 2020-21

| Sr. No. | Name ofthe teacher | Title of the book / chapters published | Title of the paper | | Year of publication | ISBN number ofthe proceeding | Affiliating Institute at the time of publication | Name of the publisher |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr. MokashiS.A. | Mandeshatil Manik Moti (Book) | Nil | Nil | 2020-21 | 978-93-8245-86-0 | Arts and Commerce College, Mayani | T. B. Mirajkar, Naga-Nalanda Prakashan, Islampur |
| 2 | Dr. MokashiS.A. | Mandesh Prashnaani Parmpara (Book) | Nil | Nil | 2020-21 | 978-93-82451-05-1 | Arts and Commerce College, Mayani | Naga-Nalanda Prakashan Islampur |
| 3 | Dr. MirajkarS.B. | Dnyanyogi | Sant Sahityache Adhyayan Ani Vividh Abhyaspaddhati | संत साहित्याचे अध्ययन आणि विविध अभ्यासपध्दती | 2020-21 | 978-93-83797-97-6 | Arts and Commerce College, Mayani | Swachanda Prakashan, Kolhapur |
| 4 | Dr. MirajkarS.B. | Patrakaritetil Dipstambha | Chaturastrya Pradnyeche Patrakar V Sampadak Dr. Babasaheb Ambedkar | चतुरस्त्र प्रज्ञेचे पत्रकार व संपादक डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 2020-21 | 978-81-953356-9-3 | Arts and Commerce College, Mayani | Padmaratna Prakashan, Kabnoor |
| 5 | Dr. MokashiS.A. | Mandeshatil Manik Moti (Book) | Nil | Nil | 2020-21 | 978-93-8245-86-0 | Arts and Commerce College, Mayani | T. B. Mirajkar, Naga-Nalanda Prakashan, Islampur |

व्यंकटेश माडगूळकर
म.गो.पाठक पँथर अरुण कांबळे
शंकरराव खरात ग.दि.माडगूळकर
पँथर अरुण कांबळे व्यंकटेश माडगूळकर
वस्ताद दादासाहेब मोकाशी
म.गो.पाठक
ग.दि.माडगूळकर
शंकरराव खरात म.गो.पाठक
पँथर अरुण कांबळे शंकरराव खरात
वस्ताद दादासाहेब मोकाशी
ग.दि.माडगूळकर शंकरराव खरात
म.गो.पाठक म.गो.पाठक
ग.दि.माडगूळकर




# माणदेशातील माणिकमोती

डॉ.सयाजीराजे मोकाशी

# माणदेशातील माणिकमोती

डॉ. सयाजीराजे मोकाशी





नाग-नालंदा प्रकाशन

Mandeshatil Manikmoti
Dr. Sayajiraje Mokashi

ISBN : 978-93-82451-86-0

माणदेशातील माणिकमोती



**लेखक**
डॉ. सयाजीराजे मोकाशी
मु.पो. शेटफळे, ता. आटपाडी,
जि. सांगली - ४१५ ३०६
मोबा. : ९९२२४२१५९५



© सर्व हक्क सुरक्षित



**प्रथमावृत्ती**
१५ ऑगस्ट, २०२१

**प्रकाशक**
त्र्यंबकेश्वर मिरजकर
नाग-नालंदा प्रकाशन
विशालनगर, मु. पो. इस्लामपूर,
ता. वाळवा, जि. सांगली
मोबा. : ९८८१०३५८०३
Email : tbmirajkar76@gmail.com

**मुद्रक**
लायन प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर

**अक्षरजुळणी**
आयुष ग्राफिक्स, कोल्हापूर

**मुखपृष्ठ**
गणेश पोतदार

मूल्य : ₹ ७० (सत्तर रुपये फक्त)

## अर्पण

शशिकांत आणि जीवन
या धाकट्या भावंडांना...

## अनुक्रम


■ मनोगत : प्रतिभावंतांच्या भूमीतून / ०३
१. वस्ताद दादासाहेब इनामदार / ०५
२. ग. दि. माडगूळकर आणि शेटफळे / १४
३. अभिजात कलावंत : व्यंकटेश माडगूळकर / २१
४. माणदेशी मोती : म. गो. पाठक / ३१
५. समाजजीवनाचे भाष्यकार : शंकरराव खरात / ३५
६. समर्थ पॅन्थर प्रा. अरुण कांबळे / ४०
७. आई / ४५
८. प्रतिभावंतांच्या दाराशी... / ५१

# वस्ताद दादासाहेब इनामदार

गणेश जयंतीला गोमेवाडीत कुस्त्यांचा जंगी फड भरलेला. साऱ्या माणदेशातील कुस्तीशौकीन गोळा झाले होते. गावोगावचे अनेक पैलवान बाजी मारण्यासाठी जमलेले होते. कुणी पंढरपूरहून तर कुणी कराड, सांगलीहून आले होते. फडात सुरुवातीला छोट्या कुस्त्या सुरू झाल्या. गणपतीच्या नावाने दिगंबर काकाने एक नारळ फडात टाकला अन कुस्त्यांच्या दंगलीला प्रारंभ झाला.

सूर्य मावळतीकडे झुकू लागला तशा मोठ्या कुस्त्या फडात सुरू झाल्या. आरोळ्या, शिट्ट्या, गलका अन दंड थोपटण्याचे आवाज वातावरणात मिसळू लागले. थंड होत निघालेल्या वाळूत दमदार कुस्त्या होऊ लागल्या. रसिक, प्रेक्षक तोंडात तंबाखूचा बिडा धरून, तोतऱ्या आवाजात पैलवानाकडे बघून टीका-टिप्पणी करू लागले. फडातील सावल्या अधिक लांबत गेल्या आणि गोमेवाडीचा मल्ल घाडगे अन प्रतापसिंह पंजाबी यांची शेवटची कुस्ती फडात सुरू झाली. प्रेक्षक आता सावरून बसले. फडातले पंच बाजूला झाले. सगळीकडे शांतता पसरली.

गोमेवाडीचा घाडगे अंगापिंडाने मोठा, पोट सुटलेला, बैलगाडीच्या साठ्यात एकटा बसेल एवढा मोठा, पण कसलेला, अचाट ताकदीचा, निमगोरा असा. तर दुसरा पंजाबी मल्ल गोरापान; देखणा, शेलाटा, सहा फूट उंचीचा अन पिळदार शरीराचा असा होता!

एक्कावन रुपये आणि मानाचा फेटा या बक्षिसाची ही शेवटची कुस्ती सुरू झाली. सुरुवातीला एकमेकाची ताकद आजमावणे सुरू होते. थोडी खडाखडी झाली. पंजाबी मल्लाचा पाय वाळूत घसरला आणि घाडगेने त्याला कवळा घातला. फडात सगळ्याची खातरी झाली की, घाडगे आता पंजाबीला बघता-बघता मुरगाळून टाकणार, चितपट करणार ! पण झाले भलतेच ! जाडजूड घाडगेंच्या तावडीतून मोठ्या शिताफीने पंजाबी निसटला अन् बाहेरची टांग लावली पण तो बधला नाही. आता खेळ रंगात आला. घाडग्याला पंजाबीने वाळूत दाबला पण तो ताकदीने उठला. तहानलेल्या घाडग्याने कुस्तीत मध्येच विश्रांती घेतली. त्याला गाववाले सल्ला देऊ लागले, 'आरे टाक की मुरगाळून, गडी हावरका हाय.'

पुन्हा कुस्ती सुरू झाली. पंजाबी अधिक जोमाने खेळू लागला. घाडगेची चाल मंदावली, तो दमला अन् पंजाबीने बरोबर मोका साधून आपली हुकमी आतली टांग लावली आणि घाडग्याचे मोठे धूड मोकार वाळूत पाठीवर पाडले. वाळू दुभंगली. तेथे खड्डा पडला. अन् फडात एकच हाळी झाली. 'बास रे बहाद्दरा, नरा, मायच्या लेकरा ! आईच्या दुधाला जागलास !' असे म्हणत लोकांनी पटके उडवले, टाळ्या पडल्या.

कैकांनी शिट्ट्या वाजवल्या. हवेत टोप्या फेकल्या अन् फड मोडला. बाहेरच्या मल्लाने गाव पांढरीतल्या मोठ्या मल्लाला चितपट केले होते. लोक नाराज झाले. कोण म्हणाले, 'चु SS चु SS हेड त्येच्या मायला. गावाचं नाक कापलं. बघ कसं पडलंय उताणं.'

कुणी मोठ्यानं हाळी दिली अन् घराकडे वळलेली माणसं क्षणभर मागे फिरली. पंजाबीने हातात एक मोठा ऊस घेतला आणि पिळून त्याचा रस काढला. कुस्ती शौकीन अवाक् झाले. 'पैलवान कुण्या. गावचं?' असे विचारू लागले.

'मला शेटफळेचा 'दादा पैलवान' म्हणतात. मी 'पंजाबी' नाव घेऊन घाडगेला चितपट करण्यासाठी आलो होतो.' हे दादा पैलवान शेटफळ्याच्या धनाजी गायकवाड-मोकाशी यांच्या वंशातले.

धनाजी गायकवाड-मोकाशी यांच्या पाचव्या पिढीत अव्वल इंग्रज कालखंडात नानासाहेब मोकाशी. होऊन गेले. त्यांना अप्पासाहेब व बाबासाहेब हे दोन मुलगे होते. ज्येष्ठ पुत्र अप्पासाहेबांनी बंडवाले नानासाहेब पेशवे यांना

आपल्या परगण्यात काही दिवस अभय देऊन दडवून ठेवले होते. शेटफळे येथील गायकवाड घराण्यातील सोळा घरात नानासाहेब मोकाशी दत्तक गेले. तरवडकी शिवारातील अडीच एकर जमीन त्यांना मिळाली होती. अप्पासाहेबांना पांडुरंग, दादासाहेब, भीमराव, श्यामराव आणि अंजूबाई ही पाच अपत्ये होती.

अप्पासाहेब मोकाशी यांचा दादासाहेब हा दुसरा मुलगा. १८८० सालच्या गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे ऑगस्ट २९, रविवारी हा मुलगा जन्मला म्हणून कृष्णा-केशव असे त्याचे पाळण्यात नाव ठेवले. पुढे मात्र घरी त्याला 'दादा' म्हणून लागले. अखेर तो मुलगा दादासाहेब या नावाने ओळखला जाऊ लागला. दादासाहेबांचे शिक्षण फारसे झाले नाही. घरची संपन्नता असल्याने कोणतीच कमतरता नव्हती. गावात घरोघर पैलवान होते. त्यामुळे दादासाहेबांचाही बालपणापासून जोर, बैठका, व्यायाम, कुस्ती यांचा रोज सराव होत गेला. ते अंगापिंडाने भरदार, पिळदार होते. एकदा ते अंघोळ करून आले. ओल्या धोतरातून पाणी गळत होते. त्यांना लहान बहीण अंजू म्हणाली, 'दादा तुमच्या अंगात जीव नाही काय ? साधं धोतर तुम्हाला पिळता येत नाही.' याचा त्यांना राग आला. दादांनी ते नवे धोतर असे काही पिळले की ते भसकले व फाटून गेले. तेव्हापासून ते ऊस पिळण्याचा सराव करू लागले. घराण्यातच कुस्तीचे बाळकडू त्यांना मिळाले होते. जत संस्थानचे अधिपती दुसरे अमृतराव डफळे हे अप्पासाहेबांचे मेव्हणे होते. महाराणी माणकाबाई डफळे या गायकवाड घराण्यातील होत्या. त्यांचे चुलत बंधू रस्तुमराव हे इंग्रज काळातील प्रसिद्ध मल्ल होते. अप्पासाहेब बाबासाहेब हेही शिकार, कुस्ती, व्यायाम यात तरबेज होते. तीच परंपरा दादासाहेबांकडे आली. अप्पासाहेबांनी दादांना कुस्ती शिकवली. शेटफळे गावात दक्षिण बाजूस नाथ मंदिराच्या पाठीमागे तालीम होती. कधीकधी विस्तीर्ण रामघाट नाल्याच्या वाळूत ते कुस्तीचा सराव करीत. पहाटेपासून व्यायाम सुरू होई. पाचशे जोर, तितक्यात बैठका, दंड, चक्रदंड, दोरीवरचा व्यायाम, विहिरीत तासभर पोहणे, शेतात खणणे, पळणे, अंत्रोबाची खडी चढणे व उतरणे असा दिवसभर व्यायाम सुरू असे. घरी दूध-दुभते भरपूर होते. आठवड्यातून तीनवेळा मांस-अंडी घेत. पुढे मात्र त्यांनी मांसाहार घेणे बंद केले. माणदेशातील अनेक कुस्ती फडावर दादांचे नांव झाले. कुर्डूवाडी, पंढरपूर, मंगळवेढा, सोलापूर, विजापूर या परिसरात दादा पैलवान यांची कुस्ती पहाणे नवलाईचे वाटू लागले. निकाली कुस्तीगीर म्हणून त्यांनी

# माणदेश

## प्रश्न आणि परंपरा

डॉ. सयाजीराजे मोकाशी



नाग-नालंदा प्रकाशन

नाग-नालंदा
प्रकाशन

Mandesh : Prashna Ani Parmpara

Dr. Sayajiraje Mokashi

ISBN : 978-93-82451-05-1

**माणदेश : प्रश्न आणि परंपरा**

**लेखक**

डॉ. सयाजीराजे मोकाशी

मु.पो. शेटफळे, ता. आटपाडी,

जि. सांगली - ४१५ ३०६

मोबा. : ९९२२४२१५९५

© सर्व हक्क सुरक्षित

**प्रथमावृत्ती**

१५ ऑगस्ट, २०२१




**प्रकाशक**

त्र्यंबकेश्वर मिरजकर

नाग-नालंदा प्रकाशन

विशालनगर, मु. पो. इस्लामपूर,

ता. वाळवा, जि. सांगली

मोबा. : ९८८१०३५८०३

Email : tbmirajkar76@gmail.com

**मुद्रक**

लायन प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर

**अक्षरजुळणी**

आयुष ग्राफिक्स, कोल्हापूर

**मुखपृष्ठ**

गणेश पोतदार

**मूल्य : ₹ १००** (शंभर रुपये फक्त)

# अनुक्रम

■ मनोगत : प्रतिभावंतांच्या भूमीतून
१. शेतकरी साहित्य इर्जिक : एक व्यापक चळवळ / ०७
२. शेतकऱ्यांच्या प्रबोधनाची गरज / १६
३. स्वातंत्र्याचा अर्थ / १९
४. ... की पारतंत्र्य चालते वाट? / २५
५. ग्रामीण भागातील शोषण / २९
६. मराठा समाज आणि आरक्षण / ३५
७. माणदेश जिल्हा व्हावा : एक चिंतन / ४०
८. माणदेशातील संशोधनाच्या नव्या वाटा / ४७
९. आटपाडी तालुक्यातील साहित्यिक परंपरा / ५३
१०. माणदेशी लोकसाहित्य / ६३
११. साहित्य संमेलन : एक चिंतन / ६८
१२. लेक लाडाची लाडाची / ७२
१३. स्वतंत्रपूर खुले कारागृह / ७७
१४. आलं रं आलं, पाणी आलं... / ८३


ज्ञानयोगी
डॉ. अमृत यार्दी गौरवग्रंथ
संपादक: डॉ. यशवंत राऊत

(डॉ. अमृत यार्दी गौरवग्रंथ)

Dr. Amrit Yardi
Gouravgranth.

**प्रकाशक**

**स्वच्छंद प्रकाशन, कोल्हापूर**

ISBN - 978-93-83797-97-6

© सर्व हक्क : **सौ. जया राऊत**

प्रथमावृत्ती : मार्च २०२१

**मुखपृष्ठ** - विनायक पाटील, धारवाड

**संपादक मंडळ**

डॉ. यशवंत राऊत
डॉ. संजय कांबळे
डॉ. चंद्रकांत पोतदार
डॉ. विनय मडगावकर

**मुद्रक :**

श्रीकांत कॉम्प्युटर्स, कोल्हापूर.

**मूल्य : ₹250/-**

# अनुक्रम

संपादकीय : डॉ. यशवंत राऊत

## डॉ. अमृत राघवेंद्र यार्दी-व्यक्ती


| | | | |
|---|---|---|---|
| १. | एक झाकलं माणिक | विरजा कट्टी | १ |
| २. | चैतन्यमयी अमृत | अक्षय यार्दी | ८ |
| ३. | डॉ. अमृत यार्दी : बहुश्रुत व्यक्तिमत्त्व | डॉ. यशवंत राऊत | १५ |
| ४. | डॉ. अमृत यार्दी : कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय गुरुवर्य | डॉ. श्रीपती रायमाने | २० |
| ५. | Man of Righteousness | Prof. Guruprasad S.Hegade | २३ |
| ६. | सहकारी मार्गदर्शक, मित्र : डॉ. अमृत यार्दी | प्रा. चारूदत्त कासार | २६ |
| ७. | डॉ. अमृत यार्दी : श्री स्वामी समर्थांचे निस्सीम भक्त | कु. सुमित्रा पाटील | २९ |
| ८. | गुरुमार्गावरचा प्रवासी | सौ. मानसी यार्दी | ३४ |


## संत वाङ्मयविषयक लेख


| | | | |
|---|---|---|---|
| १. | संत साहित्याचे अध्ययन आणि विविध अभ्यास पद्धती | डॉ. शामसुंदर मिरजकर | ४१ |
| २. | ज्ञानेश्वरी : विश्वाला परिचय करून देणारा ग्रंथ | डॉ. विनय मडगावकर | ५१ |
| ३. | संत कबीर आणि भागवत संप्रदाय | डॉ. चं. वि. जोशी | ६२ |
| ४. | मानवतेचा अहिंसक मार्गदाता -तथागत गौतम बुद्ध | डॉ. मिलिंद बागुल | ६६ |
| ५. | शाहीर परशराम यांच्या लावण्यातील अध्यात्मिकता | डॉ. संदीप सांगळे | ८१ |
| ६. | संत तुकारामांचे जीवन व मूल्यदर्शन | डॉ. द. के. गंधारे | ९४ |

# संत साहित्याचे अध्ययन आणि विविध अभ्यास पद्धती

– डॉ. श्यामसुंदर मिरजकर

मराठी साहित्याचा प्रारंभबिंदू हा संतसाहित्याचा आहे. साधारणतः अकराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत मराठीत मोठ्या प्रमाणात संतसाहित्य लिहिले गेले. महानुभाव, वारकरी व समर्थ या तीन संप्रदायात मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती झाली. या बरोबरच शैव, नाथ, जैन अशा परंपरेतूनही काही प्रमाणात साहित्य निर्मिती झाली. या सर्व प्रवाहातील सर्वात प्रभावी साहित्य परंपरा ही वारकरी आहे. ती प्राधान्याने पद्य साहित्याची आहे. त्या खालोखाल महानुभाव साहित्य प्रभावी आहे. ते गद्य-पद्य या दोन्ही स्वरूपात आहे. सुमारे सातशे वर्षे मराठी साहित्याचा मुख्य प्रवाह हा संतसाहित्याने व्यापला होता. त्यानंतर पंडित कवी व शाहिरांची परंपरा सुरू झालेली दिसते. पुढे एकोणिसाव्या शतकात इंग्रजीच्या प्रभावातून मराठीत अर्वाचीन गद्य-पद्य साहित्याला प्रारंभ झाला, असे म्हणता येते. इंग्रजांनी शिक्षणाच्या माध्यमातून भारतीयांच्या मनामध्ये नवी मूल्यदृष्टी रुजविली. तसेच ख्रिश्चन धर्माचा पुरस्कार करताना हिंदू परंपरेतील दोष दाखविले गेले. वर्णव्यवस्था, जातिभेद, स्त्रियांची दुःस्थिती व अनिष्ट प्रथा परंपरेतून जन्मलेल्या अंधश्रद्धा यावर नेमके बोट ठेवत धर्मचिकित्सा सुरू झाली. त्यामुळे अव्वल इंग्रजी कालखंडात नवशिक्षित मराठी माणूस संतसाहित्याकडे 'लौकिक जीवनापासून दूर असलेले चमत्कारांनी भरलेले भरताड' या नजरेने पाहू लागला. परिणामी वि. का. राजवाडे प्रभृतींनी 'टाळकुट्यांचे साहित्य' अशा शब्दात संतसाहित्याची संभावना केली. पुढे रा.श्री.जोगांना संत तुकाराम अभिरुचीहीन वाटले, तर

दुसऱ्या बाजूला दि. पु. चित्रे यांनी तुकारामांना विश्वकवी संबोधले. म्हणजेच समीक्षेचा लंबक मोठ्या आयामात हेलकावत राहिला. म्हणूनच र. बा. मंचरकर एके ठिकाणी म्हणतात, 'संत साहित्याची समीक्षा संख्येने विपुल आहे. तिच्यात परिश्रम आणि व्यासंग यांचे दर्शन घडते. रसिकतेला ही समीक्षा पारखी आहे, असेही नाही. तरी संत साहित्याचे सर्वांगीण निदान यथार्थ आकलन त्यातून होत आहे, असे जाणवत नाही. या खुरटेपणाची कारणे नव्या युगमहिम्यात आणि आपल्या वाङ्मयीन संस्कृतीत आहेत.''

या पार्श्वभूमीवर आज संत साहित्याचा अभ्यास करताना कोणता दृष्टिकोन स्वीकारावा, कोणती अभ्यास पद्धती योजावी, असा प्रश्न बहुतेकांना पडलेला असतो. वास्तविक पाहता आज घडीला सदानंद मोरे, म. वा. धोंड, दि. पु. चित्रे, भालचंद्र नेमाडे, सतीश बडवे, आ. ह. साळुंखे, रा. चिं. ढेरे आणि तारा भवाळकर आदी अभ्यासकांनी संतसाहित्य अभ्यासाच्या काही दिशा आपणा समोर ठेवल्या आहेत. तरीही नव्याने संतसाहित्याचा अभ्यास करताना एक नेमका विचारव्यूह आपणासमोर असणे गरजेचे आहे.

**अभ्यासक आणि त्यांचे हेतू**

संत साहित्याचा अभ्यास कोण करत आहे आणि का करत आहे, याचा आपणास प्रथम विचार करावा लागेल. सामान्यतः संत साहित्याचे वाचन त्या-त्या संप्रदायातील लोक मोठ्या प्रमाणात श्रद्धेय भावनेने करतात. त्यामध्ये चिकित्सेला थारा नसतो. तरीही काही अध्यात्मनिष्ठ, धर्मनिष्ठ अभ्यासकही पुढे येतात. ते एक प्रकारे स्वतःच्या पंथातील संतविचार अधिक स्पष्ट करण्यासाठी किंवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अभ्यास व लेखन करताना दिसतात. शंकर अभ्यंकर, दीपक भागवत अशांचे लेखन या पद्धतीचे आहे. समाजशास्त्रज्ञ, नीतिशास्त्रज्ञ, दैवतशास्त्र व धर्मशास्त्राचे अभ्यासक, अर्थशास्त्रज्ञ, स्त्रीवादी अभ्यासक, तत्त्वज्ञ,

पर्यावरणशास्त्रज्ञ असे अभ्यासकही संत साहित्याचे अध्ययन करताना दिसतात. परंतु त्यांचा अभ्यास हा त्यांच्या अभ्यासविषयातील गृहितकांच्या पुष्ट्यर्थ झालेला असतो. उदाहरणार्थ, 'लीळाचरित्राच्या आधारे तत्कालीन समाज जीवनाचा अभ्यास' किंवा 'लीळाचरित्रात ग्रंथित झालेली स्त्रीजीवन' यामध्ये साहित्य अभ्यास फारच कमी असतो आणि समाजशास्त्रीय आकलनावर भर दिलेला असतो.

आपण जेव्हा वाङ्मयीन परिप्रेक्ष्यातून संतसाहित्याचा अभ्यास करू, तेव्हा आपणाला काही गोष्टी नीटपणे समजून घ्याव्या लागतील. पहिली गोष्ट म्हणजे आपण संतांकडे कवी, साहित्यिक या दृष्टिकोनातून पाहतो व त्यांचे लेखन हे आपल्या दृष्टीने साहित्यकृती किंवा संहिता असते ('साहित्यकृती' या संज्ञेत लेखकाचा प्रत्यक्ष सहभाग, सहेतुक कृती, कलात्मकता यांना महत्त्व येते, तर 'संहिता' ही संज्ञा बाह्य दबाव घटकांपासून मुक्त असणारी 'शाब्द संघटना' या अर्थाने येते. थोरात हरिश्चंद्रः २००५) मात्र कवी असणे हा संतांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा पैलू असतो. त्यांनी आरंभलेल्या सांप्रदायिक कार्यातील हेतुपूर्वक केलेली कृती म्हणजे त्यांचे लेखन असते. विशेष म्हणजे संतकवी हा विशिष्ट संप्रदायाच्या तात्त्विक विचारविश्वाच्या जडण-घडणीतील भागीदार असतो. म्हणजेच संप्रदाय, संतकवी व संतसाहित्य या परस्परावलंबी गोष्टी असतात. म्हणून आपण संतांकडे केवळ कवी म्हणून पाहू शकत नाही. म्हणून आपण संतांकडे केवळ कवी म्हणून पाहू शकत नाही. तर त्यांच्या लेखनाकडे केवळ काव्य म्हणून पाहू शकत नाही. तर सांप्रदायिक संदर्भात संतकार्य, कवित्व व संतसाहित्य यांचा अभ्यास करावा लागतो.

संत साहित्याची निर्मिती प्रायः दोन कारणांनी होत असते. संप्रदायाचे आचार-विचार, संप्रदायाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करण्यासाठी प्रथम लेखन केले जाते. अशा लेखनातून संप्रदायाची जडणघडण होत राहते. विशेषतः प्रारंभ काळातील विशिष्ट संप्रदायातील

त्यांपैकी आजरेकर फडात विठ्ठलमूर्ती ऐवजी ग्रंथाची पूजा होते आणि या ग्रंथाला स्पर्श करून गळ्यात माळ घालून वारकरी होता येते. या सगळ्याच्या आधारे आपणास वारकरी संप्रदायातील गुरू संस्थेवर वेगळा प्रकाश टाकता येऊ शकतो.

**काळाची संदर्भ चौकट**

संत साहित्याचे आकलन अध्ययन करताना आपण काळाची संदर्भचौकट कोणती वापरतो, ते अत्यंत महत्त्वाचे आहे. संतकवी ज्या काळात जन्मले, ज्या समाज-सांस्कृतिक पृष्ठभूमीवर त्यांची जडणघडण झाली आणि ज्या वाङमयीन पर्यावरणात ते लिहिते झाले, ते लक्षात घेतल्याशिवाय आपणाला योग्य निर्णयन करता येणार नाही. नामदेव 'वैकुंठ कोपट जुनाट झोपडी' असे म्हणतात किंवा ज्ञानदेव 'स्वधर्म अधिकार जातीपरत्व भेद। उचित ते शुद्ध ज्याचे तया।।' असे म्हणतात त्याचा अन्वयार्थ काळाच्या संदर्भ चौकटीत लावावा लागेल. म्हणजेच एका अर्थाने संतसाहित्याचे नेमके आकलन व्हावयाचे असेल, तर समाज-सांस्कृतिक संदर्भातून अभ्यास गरजेचा ठरतो.

मराठीत दि. के. बेडेकरांनी साहित्य आणि संस्कृतीचा सहसंबंध स्पष्ट करताना म्हटले होते की, साहित्यावर नेहमीच संस्कृतीचा प्रभाव असतो आणि चांगले साहित्य संस्कृतीची जडणघडण करत असते. याच संदर्भात सुधीर रसाळ 'संस्कृती आणि वाङमय निर्मिती' या लेखात म्हणतात, 'प्रत्येक लेखकाला त्याच्या संस्कृतीतील वाङ्मय प्रकारांच्या स्वरूपाची आणि त्यातील वाङमयीन संकेतांची सुप्तासुप्त जाणीव असते. प्रत्यक्ष निर्मिती करताना प्रस्थापित संकेतांच्या उपयोजनेतील त्याचे प्रभुत्व प्रकट होत असते. संस्कृतिनिर्मित वाङमय प्रकार आणि त्यांची संकेतव्यवस्था यांवर संस्कृतीचा घटक असणाऱ्या लेखकाची मालकी असते. म्हणून त्यांची मोडतोड करणे, त्याच्या कक्षा कमी-

अधिक करणे, वाङ्मयप्रकारांचे मिश्रण करणे आणि नवे वाङमयीन संकेत निर्माण करून एकूण संकेतव्यवस्थेत त्याची भर घालणे हा त्याचा अधिकार असतो.' (सुधीर रसाळ : २०१०)

वरील दोन्ही संदर्भात आपण संतसाहित्याचा अभ्यास करू शकतो. तत्कालीन संस्कृतीचा संप्रदायावर असणारा प्रभाव आणि संप्रदायाचे संस्कृतीच्या जडणघडणीतील योगदान, असा विचार करता येतो. याला संस्कृतिनिष्ठ आकलन म्हणता येते. वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राचा लोकधर्म घडविला. सात्त्विक जीवनाचा पुरस्कार केला. त्यामुळे गावागावात वाङ्मयाची जाण असणारी व विशिष्ट मूल्यनिष्ठा असणारी लोकसंस्कृती रुजली, हे स्पष्टपणे दिसते. लोकसाहित्याच्या अंगानेही संतसाहित्याचे आकलन करून घेता येते. दुर्गा भागवतांनी 'पैस' या संग्रहात पंढरीच्या विठोबाचा शोध धनगरी ओव्यांमधून घेतला आहे. त्याच्याच पुढे जाऊन आदिबंधात्मक समीक्षेचा वापर करून संतांच्या चमत्कार कथांमधील मिथकांची उकल करता येते. संतांनी लोकपरंपरेतून अनेक रचनाबंध घेतले आहेत. त्याचाही विचार करता येईल. संत साहित्याचे स्त्रीवादी पुनर्वाचन करून काही नवे निष्कर्ष हाती येऊ शकतात. जी जनाबाई आपल्या प्रत्येक अभंगात 'म्हणे नामयाची जनी' अशी नाममुद्रा वापरते, त्या जनाबाईचा उल्लेख नामदेवांच्या फक्त एका अभंगात होतो. यावरून नामदेवांच्या लेखी जनाबाई दुय्यम होती, असे वाटू लागते. नामदेवांनी तरुण स्त्रियांवर अविश्वास व्यक्त केला आहे. 'सुंदर आणि पतिव्रता.....हे दुर्लभ जी दातारा।।' असे त्यांनी म्हटले आहे. शरयू बाळांच्या मते नामदेवांचे हे अनुदार उल्लेख वाचकांना धक्का देणारे असेच आहेत. दुसऱ्या बाजूला 'स्त्री जन्म म्हणोनि न व्हावे उदास।' म्हणणारी आणि 'डोईचा पदर आला खांद्यावरी। भरल्या बाजारी जाईन मी।।' असे म्हणत संघर्षसिद्ध झालेली जनाबाई अभ्यासताना तिच्या अभंगांकडे स्त्रीवादी

दृष्टिकोनातून पाहण्याचा मोह आवरत नाही. संतसाहित्याचा शैलीविज्ञानाच्या दृष्टीनेही आपणास अभ्यास करता येईल. 'विराणी' लिहिताना भावव्याकुळ होणारे ज्ञानदेव श्री विठ्ठलाचे रूप गुण वर्णन करताना थोडे तटस्थ होतात. याउलट असेच श्री विठ्ठलाचे वर्णन करताना नामदेव मात्र भावविभोर होतात, तर त्यांची समकालीन जनाबाई अधिकच मृदू , लयतत्त्व, जपणारी अभिव्यक्ती करते हा शैलीभेद विशेष अभ्यासण्याजोगा आहे. याशिवाय संतसाहित्याचे आकलन संरचनावाद, देशीवाद अशा विविध पद्धतीशास्त्रांचा वापर करूनही करता येईल. काही अभ्यासक फुले-आंबेडकरी दृष्टिकोण किंवा संवैधानिक मूल्यनिकषांच्या प्रकाशझोतात संतसाहित्याचे आकलन करू पाहतात. असा अभ्यास परिपूर्ण असणार नाही. पण उद्बोधक निश्चितच असेल, असे मला वाटते.

**संदर्भ**

१. थोरात हरिश्चंद्र, साहित्याचे संदर्भ, मौज, २००५
२. रसाळ सुधीर, वाङमयीन संस्कृती, मौज, २०१०

◆◆◆

# पत्रकारितेतील दीपस्तंभ

प्रा. रवींद्र पाटील



# अंतरंग


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर | - श्री.प्रसाद माधव कुलकर्णी | १३ |
| २. | बहुजनांच्या जागृतीसाठी कृष्णराव भालेकर यांची पत्रकारिता | - प्रा.डॉ.एकनाथ शामराव पाटील | १७ |
| ३. | लोकमान्य टिळक यांची पत्रकारिता | - डॉ.हेमंत दत्ताजीराव मोरे | २३ |
| ४. | सामाजिक सुधारणांसाठी आग्रही संपादक गोपाळ गणेश आगरकर | - प्रा.रवींद्र बाबासो पाटील | २९ |
| ५. | 'हंटर'कार खंडेराव बागल | - प्रा.नानासाहेब पांडुरंग जामदार | ३६ |
| ६. | तेजस्वी पत्रकारितेचा मानबिंदू काकासाहेब खाडिलकर | - श्री.अशोक केसरकर | ४२ |
| ७. | पहिल्या महिला ब्राह्मणेतर संपादिका तानुबाई बिर्जे | - अर्चना कृष्णात बनगे | ४८ |
| ८. | सत्यशोधकी जागल्या श्रीपतराव शिंदे | - प्रा.शिवाजीराव भुकेले | ५२ |
| ९. | चतुरस्त्र प्रज्ञेचे पत्रकार व संपादक डॉ.बाबासाहेब आंबेडकर | - प्रा.डॉ.श्यामसुंदर मिरजकर | ५८ |
| १०. | आचार्य अत्र्यांची मूल्यप्रधान पत्रकारिता | - श्री.संजय लक्ष्मण भारती | ६६ |
| ११. | समाजसेवेसाठी आग्रही डॉ.नानासाहेब परुळेकर | - श्री.अतुल शांतीनाथ मंडपे | ७० |
| १२. | पद्मश्री 'सत्यवादी'कार बाळासाहेब पाटील | - प्राचार्य श्रीधर हेरवाडे | ७४ |
| १३. | ध्येयवादी संपादक पद्मश्री डॉ.ग.गो.जाधव | - डॉ.शिवाजी जाधव | ७८ |
| १४. | निर्भीड झंझावात बाळ ठाकरे | - श्री.भाऊसाहेब फास्के | ८३ |
| १५. | बहुआयामी व्यक्तिमत्त्व जवाहरलाल दर्डा | - श्री.भाऊसाहेब फास्के | ८८ |
| १६. | लढवय्ये संपादक बाबुराव ठाकुर | - श्री.गुरुबाळ माळी | ९२ |
| १७. | प्रतिभाशाली पत्रकार अनंत भालेराव | - डॉ.श्रीकांत श्रीपती पाटील | ९९ |
| १८. | कर्मयोगी संपादक मुरलीधर शिंगोटे | - प्राचार्य भास्कर चंदनशिवे | १०४ |
| १९. | संपादकीय जाणिवेचे संपादक अनंत दीक्षित | - श्री.अभिजीत अरुण कुलकर्णी | १०८ |
| २०. | निर्भीड पत्रकारितेचे प्रतिक निखील वागळे | - श्री.ताज अ.मुल्लाणी | १११ |



# ९ चतुरस्त्र प्रज्ञेचे पत्रकार व संपादक डॉ.बाबासाहेब आंबेडकर

स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी पत्रकारिता विविध ध्येय उद्दिष्टांनी प्रभ होती. समाजाच्या बौद्धिक विकासाची लोकहितेच्छू वृत्ती, सामाजिक सुधार आग्रह, धार्मिक परंपराभिमान व जाज्वल्य देशाभिमान अशा अनेक प्रेरणांनी नि निघत गेली. दर्पण (१८३२), मित्रोदय, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, अरुणोदय, प्र सुधारक ही लोककल्याणार्थ आणि ज्ञानप्रसारार्थ चालवलेली वृत्तपत्रे! पुढे १८८१ केसरी व मराठा ही वृत्तपत्रे सुरू झाली आणि देशाभिमानाची दुदुंभी फुंकली गेली. पठडीतील गुराखी, राष्ट्रमत, महाराष्ट्र ही पत्रे होती. ती परंपरावादीही होती. 'संदेश अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी वृत्तपत्रे म्हणजे माहिती आणि वैचारिक वाद-विव रूढ भूमिका सोडली. अनेक सदरे, विविधांगी वाचनीय मजकूर आणि रंजक साहि

महत्त्वाचे कार्य 'प्रबुद्ध भारत'ने केले. डॉ. आंबेडकरांचा धर्मांतराचा प्रवास, त्या संदर्भात लोकांनी उपस्थित केलेले प्रश्न व त्यांची उत्तरे, बौद्ध वाङ्मयाचा परिचय यासंबंधी लेखन अंकातून प्रसिद्ध झालेले दिसते. त्याबरोबरच मुंबई केंद्रशासित ठेवण्याचे राजकारण, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, नेहरूंच्या धोरणाचे वाभाडे असे कितीतरी विषय या अंकातून आलेले दिसतात. 'प्रबुद्ध भारत'चे अंक म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या मार्गक्रमणेची दैनंदिनी होय. बहिष्कृत ते प्रबुद्ध अशा विकासाचा दस्तऐवज म्हणूनही त्याकडे पाहता येते.

एकंदर, भारतातील रक्तविहीन सामाजिक क्रांतीचे वाहक आणि साक्षीदार म्हणजे आंबेडकरांची वृत्तपत्रे होत. मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता आणि प्रबुद्ध भारत या शीर्षकातूनच हा विकासक्रम स्पष्ट होतो. बाबासाहेबांची पत्रकारिता मूक असणाऱ्या समाजाचा नायक म्हणून उभी राहिली. भारतातच एक मोठी लोकसंख्या असणारा वर्ग बहिष्कृत आहे, याची स्वतंत्र जाणीव एतद्देशीय व परकीय राज्यकर्त्यांना करून दिली गेली. ही बहिष्कृत असणारी लोकसंख्या उद्याच्या स्वतंत्र भारताची 'जनता' असेल आणि ती निश्चितच 'प्रबुद्ध' असेल असा विश्वास बाबासाहेबांच्या लेखणीने या भारतभूमीला दिला. एका प्रचंड मोठ्या मुक्या लोकसमूहाचे रूपांतर शासनकर्त्या जमातीत करण्याचे भव्य दिव्य स्वप्न डॉ. आंबेडकरांनी पाहिले आणि त्याचा राजमार्ग आपल्या लेखनातून आखून दिला. भारतातील कोणत्याही समकालीन नेत्याला/संपादकाला साधता आला नाही, असा चमत्कार त्यांनी बुद्धी, वाणी आणि लेखणीच्या माध्यमातून घडविला. म्हणूनच बाबासाहेबांची पत्रकारिता ही एकाच वेळी मानवमुक्तीची आणि नव भारताच्या निर्मितीची गाथा आहे.

**प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर**
कला, वाणिज्य महाविद्यालय, मायणी
ता. खटाव, जि. सातारा ४१५ १०२, दूरभाष : ९४२१२१२३५२